महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 922 /२०२४ दि. 12/०८/२०२४

**'वाहतूक नियंत्रण अधिसूचना'**

संदर्भ :– राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११ नवी मुंबई कॅम्प काळेगांव ता.जि.ठाणे यांचेकडील प्राप्त पत्र जा.क्र./रारापोबल/गट ११/प्रलि.आशा/पो.भ./२०२४/३२१२ दिनांक ०८/०८/२०२४

––––oooo––––

**ज्याअर्थी,** विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागाचे हदद्दीत राज्य राखीव पोलीस बल गट क्र. नवी मुंबई आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई २०२२–२०२३ प्रक्रिया लेखी परिक्षा दिनांक १३/०८/२०२४ व १४/०८/२०२४ रोजी पलावा इंडस्ट्रीअल पार्क फेज ०२ उसाटणे, ता.अंबरनाथ जि. ठाणे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. याकरिता सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) जे.एन.पी.टी., कळंबोली, तळोजा एमआयडीसी नवी मुंबई कडून उसाटणे मार्गे खोणी कल्याण – डोंबीवली – उल्हासनगर – अंबरनाथ – बदलापूर कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **' नितळस फाटा'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कळंबोली सर्कल येथून रसायणी – कर्जत – नेरळ – बदलापूर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण – डोंबीवली – उल्हासनगर – अंबरनाथ – बदलापूर कडून खोणी उसाटणे मार्गे जे.एन.पी.टी.– कळंबोली – तळोजा एमआयडीसी नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **'खोणी फाटा'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खोणी येथून डावीकडे वळण न घेता सरळ पुढे जावून काटई – शिळफाटा मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. १३/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० व दि. १४/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:००ते रात्रौ २३:०० वाजे पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( सचिन गोरे )**
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक/ पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई,
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे /नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.

CS CamScanner